**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक- ७९/२०२३**
**महा. शासन वि. निवृत्ती कृष्णा पाटील**
**निशाणी क्रमांक- ३०/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - ५ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | आनंदा नाना जोशी |
| वय | - | ४३ वर्षे |
| व्यवसाय | - | शेती |
| पत्ता | - | क. तारळे, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत सुरू-**

**१.** दि. २२/०३/२०२३ रोजी क. तारळे - दुर्गमानवाड रोड, क. तारळे गावच्या हद्दीत शरीफ आप्पासो नाईक यांचे शेताजवळ पोलीसांसोबत सकाळी ११:१५ वाजताचे सुमारास पंचनामेकरिता गेलो होतो. सदरील वेळी माझेसोबत आणखी एक पंच बंडोपंत विष्णू जोशी हजर होते. सदरील ठिकाणी सदाशिव लक्ष्मण जोशी हे हजर होते. सदाशिव जोशी यांनी घडलेल्या अपघाताची माहिती सांगितली व घटनास्थळ दाखविले. सदरील घटनास्थळ हे क. तारळे ते दुर्गमानवाड या २० फुटी रस्त्यावर असून सदरील रस्त्याचे दोन्ही बाजूस ३ फुट कच्च्या रस्त्याच्या साईड पट्टया आहेत. दुर्गमानवाड पासून तारळेला येत असताना रस्त्याच्या डाव्या बाजूच्या साईड पट्टीवर शरीफ आप्पासो नाईक यांच्या शेताजवळ सदरील अपघात घडला.

**२.** पोलीसांनी आमचे समक्ष सदरील घटनास्थळाचा पंचनामा केला. तो मला दाखविण्यात आला. वाचून त्यावर मी सही केली. तो आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यातील अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्या

पंचनामेस **निशाणी P31/PW5** देण्यात येते. सदरील वेळी फोटो देखील घेण्यात आले. ते आता मला दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यास **आर्टीकल-१** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ वकील श्री. व्ही. बी. पाटील यांचेमार्फत सुरू-**

३. मी राधानगरी पोलीस ठाणे पाहिले आहे. सदरील तथाकथीत घटनेनंतर मी अनेक वेळा राधानगरी पोलीस ठाणेत गेलो आहे. सदरील घटनेसंदर्भात एकदाच पोलीस ठाणेत गेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाणेत आलो तेंव्हा मी पंचनामेवर सही केली. सदरील घटनास्थळापासून माझे घर ५०० फुट अंतरावर आहे. सदरील पंचनामा करणेकरिता पोलीसांनी मला घटनास्थळावरून जात असताना थांबविले. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी जाणेपूर्वी पोलीसांनी मला कोणताही संपर्क केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी, जखमी आणि साक्षीदार शेखर हे माझे ओळखीचे आहेत.

**प्रश्न :** सदाशिव जोशी हे तुमचे नातलग आहेत.
**उत्तर :** दुरचे नातेवाईक आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, सदाशिव जोशी यांचे घर माझे घराजवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे घर माझे घराजवळ आहे. सदरील पंचनामेवेळी घटनास्थळी मी, बंडोपंत जोशी, सदाशिव जोशी, फिर्यादी, पोलीस आणि काही ग्रामस्थ उपस्थित होते. सदरील वेळी किती पोलीस उपस्थित होते हे मला सांगता येणार नाही.

**प्रश्न :** तुम्ही ११.१५ वाजता गेलेनंतर किती वेळाने पंचनामा सुरू झाला ?
**उत्तर :** पंचनामा ११.१५ वाजता सुरू होऊन अंदाजे १२.३० वाजता पूर्ण झाला.

मी पंचनामा सुरू होण्यापूर्वी १० ते १५ मिनीट अगोदर घटनास्थळी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हे माझे आधिपासून घटनास्थळी हजर होते. हे म्हणणे खरे नाही

की, फिर्यादी यांनी मला अपघाताविषयी आधी सांगितले होते. मी सदरील वेळी जात असलेल्या शेताचे अंतर घटनास्थळापासून अंदाजे १ किमी. आहे. घटनास्थळापासून फिर्यादी यांचे घर ३०-३५ फुट अंतरावर आहे. घटनास्थळ आणि फिर्यादी यांच्या घरामध्ये नाईक यांची शेत मिळकत रस्त्याला लागून आहे. दुर्गमानवाड ते तारळे जाणारे रस्त्याच्या डाव्या बाजूस फिर्यादी यांचे घर आहे.

**प्रश्न :** पंचनामेमध्ये रस्त्याच्या उत्तरेला फिर्यादी यांचे घर असल्याबाबत नमूद आहे.
**उत्तर :** घर डाव्या बाजूला आहे. मला दिशा सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, गणेश बळवंत जोशी हे माझे नातेवाईक आहेत. पंचनामा करतेवेळी घटनास्थळावर गाडी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला न विचारता पोलीसांनी स्वत:च्या मनाने पंचनामा लिहून त्यावर आमची सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांना मदत करण्यासाठी मी खोट्या पंचनाम्यावर सही करून आजरोजी न्यायालात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

दिनांक : १०/०२/२०२६

Sd/-
**(एन. पी. काकडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र. २), राधानगरी